# “१९७० नंतरच्या महाराष्ट्रातील वैचारिक परंपरा आणि जात-वर्ग लिंगभाव: समाजशास्त्रीय अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विध्यापीठातील मानव्य विध्याशाखेतील पीएच.डी (समाजशास्त्र) पदवी नोंदणीसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

**संशोधक**

**कांबळे संजयकुमार**

(सहाय्यक प्राध्यापक)

स्त्री आणि लिंगभाव विभाग

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**मार्गदर्शक**

**अन्सारी एस.जी.**

सहायक प्राध्यापक,

समाजशास्त्र विभाग प्रमुख

महाराष्ट्र उदयगिरी महाविध्यालय ,उदगीर

**संशोधन केंद्र**

**सामाजिकशास्त्रे संकुल**

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड**

**जुलै- २०२१**

**प्रस्तावना :-**

भारतीय समाजशास्त्रात जात ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून बरेच अभ्यास झाले आहेत. पण जातीव्यवस्थेच्या अभ्यासाच्या संदर्भात घुर्ये, केतकर, कर्वे आणि श्रीनिवास यांच्याच विचारांचा अभ्यासक्रमात समावेश असल्याचे दिसते. विद्यापीठीय स्तरावर जातीची वैशिष्ट्ये, ड्यूमाँटचा शुद्धता व विटाळ या संकल्पनांचा प्रभाव आहे. श्रीनिवास यांची संस्कृतीकरणाची संकल्पनाच केवळ जाती अध्ययनात मुलभूत मानली गेली. समाजशास्त्रामध्ये सध्या प्रभावी असलेला विचारप्रवाह असे मानतो की, शुद्धता व विटाळ यांच्या कल्पनांनी बनलेली एक निश्चित अशी विचारप्रणाली हा जातीव्यवस्थेचा पाया आहे, एक निश्चित अशी सामाजिक-आर्थिक-राजकीय परिस्थिती नव्हे. या विचारप्रवाहातील समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टीने जातीचा भौतिक परिस्थितीशी फारसा संबंध नाही या अभ्यासकांनी संरचनात्मक-कार्यवादी किंवा प्राच्यविद्याभ्यासातून हिंदू धर्मशास्त्राला प्रमाण मानून अभ्यास केला असल्याचे दिसते. त्यामुळे त्यांनी जातीची व्याख्या हिंदू धर्माच्या संदर्भात केली आहे.परंतु नव्या सामाजिक चळवळींमुळे विविध विचारसरणींचा, सिद्धांताचा आणि संकल्पनांचा जसजसा विकास होऊ लागला तसतसे अधिक सखोलपणे आणि चिकित्सकपणे ज्ञान आणि सत्ता यांच्या उकल करण्यासंदर्भात अभ्यास होऊ लागले. त्यामुळे समाजशास्त्रीय अभ्यासात जातीच्या विश्लेषणात सैद्धांतिक आणि वैचारिक संघर्ष होऊ लागल्याचे दिसते.

सैद्धांतिक पार्श्वभूमी:

ज्ञानाचे समाजशास्त्र (Sociology of knowledge) ही समाजशास्त्राची व्यापक ज्ञानशाखा आहे. या ज्ञानशाखेचा उदय आणि विस्तार अप्रत्यक्षपणे सोळाव्या शतकापासून झालेला दिसत असला, तरी त्याला एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून शास्त्रीय बैठक मिळू लागली. समाजव्यवस्था आणि विचारप्रणाली यांचा संबंध कसा आणि किती असतो, त्या दोन्हींच्या एकमेकांवर प्रतिक्रिया कशा घडतात, त्याचा समाजाच्या रचनेवर आणि सामाजिक वर्तनाचा किती परिणाम होतो, या सर्वांचा विचार ज्ञानाच्या समाजशास्त्रात केला जातो. या शाखेचे अभ्यासक ज्ञानविषयक समाजशास्त्रीय विश्लेषणाच्याही पुढे जाऊन त्यातून निर्माण होणारे तत्वज्ञान, राजकीय विचारसरणी संबंधित सिध्दांत अशा व्यापक पार्श्वभूमीचाही परामर्श घेतात. तसेच समाजरचनेशी या सर्वांचा कसा संबंध असतो व त्यामागे सामाजिक इतिहास घटनांचे स्वरुप कसे बनते, हे सर्व ज्ञानाचे समाजशास्त्र विशद करते. भारतीय समाजशास्त्राच्या अध्ययनात मार्क्सवादी दृष्टीकोनाने विशेष प्रभाव टाकलेला आहे.

संरचनात्मक-कार्यवादी (Structural - Functional) दृष्टीकोनाचा पुरस्कार करतेवेळीसुद्धा अभ्यासकांना मार्क्सवादी विश्लेषणाकडे दुर्लक्ष करता येत नाही. भुतकालीन घटनांचे, समाजरचनेतून निर्माण झालेल्या सामाजिक संबंधांचे, राजकीय व आर्थिक व्यवस्थेचे मुल्यमापन करतेवेळी मार्क्सवादी विचारपरंपरेचा अनेक अभ्यासकांनी अवलंब करण्याकडे विशेष भर दिलेला आहे.

दुसरा दृष्टीकोन म्हणजे ज्ञानाच्या समाजशास्त्राची पद्धत यात विचारांचे परीक्षण करणे, त्यांची अतिशय काटेकोर चिकित्सा करणे. ज्ञानाच्या समाजशास्त्रात तात्विक विचार, संकल्पना त्यांच्या चिकित्सेचा इतिहास असतो. समाजशास्त्रात समस्यांची उत्तरे शोधणे. आणि ती तपासणे, त्यात दुरुस्ती करणे, पुन्हा मांडणे, त्यात पुन्हा दुरुस्ती असेल तर ती करणे, आणि असे नेहमी करणे ही ज्ञानाच्या समाजशास्त्राची पद्धत असते. याला तात्विकीकरण म्हणता येईल. तात्विकीकरण अटळ आणि अखंड प्रक्रिया असते. ते नेहमी 'आज'च्या वर्तमानकाळात घडत असते.यादृष्टीकोनातून समाजशास्त्रीय विचाराचा इतिहास उलगडतो आणि तो प्रवाही, जिवंत राहतो. म्हणजे असे: एखादी कल्पना अथवा संकल्पना समजावून घेणे हे जेवढे महत्वाचे असते तेवढेच ती तपासणे महत्वाचे असते. किंबहुना ती जास्त महत्वाची आणि मूलगामी कृती असते. तपासणे याचा अर्थ बदललेल्या समाजशास्त्रीय पद्धतीशास्त्रानुसार ही तपासणी करावी लागते.

कॉ. शरद पाटील, गेल ऑम्व्हेट, रावसाहेब कसबे यांनी त्यांच्या साहित्यातून मोठया आत्मियतेने फुले-शाहू-आंबेडकरांच्या प्रेरणेतून महाराष्ट्रात उदयाला आलेल्या अनेकविध चळवळींचा आढावा घेतला आहे. केवळ जातिचळवळी व वर्ग चळवळीच नव्हेत, तर आधुनिक महाराष्ट्राच्या शे-सव्वाशे वर्षांत फुले-आंबेडकरी प्रेरणा ज्या ज्या क्षेत्रात प्रकट झाली, त्या सर्व चळवळींचा, व्यक्तींचा, संस्थांचा एक आलेखच त्यांनी प्रस्तुत केला आहे. बा्रम्हणेत्तर आणि इतर चळवळींची समीक्षा त्यात आहेच, तसेच फुले-आंबेडकरी विचाराच्या संदर्भात सुधारणा चळवळ, राष्ट्रीय आंदोलन, साम्यवादी चळवळींची व त्यांच्या विचारांची मीमांसा त्यात आहे. स्त्री चळवळीचा चिकित्सक मागोवा त्यात आहेच, पण स्त्री-शुद्रातिशूद्रांच्या अनेक आंदोलनांचा आढावाही त्यात आहे. इतकेच नाही तर बुद्धकालीन समाजव्यवस्थेपासून रामायन-महाभारत, संत चळवळ ते उत्तर आधुनिकतेपर्यंतच्या त्यात वेध आहे.

जातिव्यवस्थेचे स्वरुप खुप गुंतागुंतीचे आहे. समकालीन संदर्भात विचार केला तर मागासलेपणाची वर्गवारी जातीच्या संदर्भात करून ती प्रशासकीय पातळीवर सुस्थापित होणे, सर्वोच्च न्यायालयाचे या धोरणावर शिक्कामोर्तब होणे, स्थानिक शासन यंत्रणांच्या पातळीवर जातीच्या आधारे प्रतिनिधित्व व सत्तापदे आरक्षित ठेवली जाणे इ. मार्गांनी आपले औपचारिक चर्चाविश्व बदलत गेले. मात्र नेमक्या याच टप्प्यावर खुद्द जातीसमाजाची रचना ढवळून निघण्याला गती आली आहे. जातीचे परस्परसंबंध, जातींच्या पारंपारिक उतरंडीतील फेरफार, जात आणि व्यवसाय यांच्या नव्या आकृतीबंधाचा उदय आणि नवभांडवलशाही व्यवस्थेतून जात पोखरली जाणे या सर्वांमुळे नव्वदीच्या दशकात जातीव्यवस्थेचा पेचप्रसंग नकळतपणे साकारला. त्यामुळे प्रचलित वर्गवा-या व प्रचलित समीकरणे दोन्ही अप्रस्तुत ठरण्याची शक्यता निर्माण झाली. या पार्श्वभुमीवर मग सर्वोच्च न्यायालयाचा पी. राजेंद्रन विरुद्ध मद्रास सरकार केसच्या परिणामी सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणा ओळखण्यासाठी जातवार वर्गीकरण कायदेशीर ठरले. तर बालाजी व चित्रलेखा या केसेसमध्ये ‘जातीय’ निकष हा वर्गीकरणाचा एकमेव पाया असल्याचे नाकारण्यात आले होते. पण राजेंद्रन केसने, उपरोक्त केसेसच्या निकालांचे खंडन न करता, “जात ही सुद्धा नागरीकांचा एक वर्ग आहे.” या आधारावर जातवार वर्गीकरणाला मान्यता दिली. (पाटील, शरद; २००७; पृ. ३०)

**संदर्भ साहित्याचा आढावा :**

याच पार्श्वभुमीवर डी. पी. मुखर्जी, ए. आर. देसाई आणि रामकृष्ण मुखर्जी इत्यादींनी ऐतिहासिक द्वंव्दात्मक दृष्टीकोनातून आपल्या समाजशास्त्रीय विचारांची मांडणी केली. (गजेंद्रगड/मारुलकर; २०००; पृ. ३१७) तर के. एल. शर्मा यांनी ‘कास्ट, अँड क्लास इन इंडीया’ आणि ‘सोशल इनइक्वॅलिटी इन इंडिया’ (रावत, १९९५) हे संपादित ग्रंथ प्रकाशित केले. त्याअगोदर १९८६ साली नवी दिल्ली येथे जी अकरावी जागतिक समाजशास्त्र परिषद आयोजित करण्यात आली होती, त्या परिषदेत रशियन समाजशास्त्रीय संस्थेच्या वतीने ‘द्वंद्वात्मक समाजशास्त्र’ (Dialectical Sociology) या विषयावर एक स्वतंत्र चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या परिषदेत असे मत व्यक्त करण्यात आले की, जमीनदारी, सावकारी व सरंजामदारी या पद्धतीचा आणि जातिनिष्ठ व वर्गीय स्वरुपाच्या समाजव्यवस्थेचा प्राचीन काळापासून भारतात अवलंब केलेला असल्यामुळे त्या समाजव्यवस्थेचे नेमके अध्ययन द्वंद्वात्मक पद्धतीने केल्यामुळेच भारतीय समाजाची वास्तवता अधिक स्पष्ट होऊ शकते; कारण सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत विरोधाचे किंवा संघर्षाचे स्थान विशेष महत्त्वाचे असते. मानव समाजाचा विकास हा जरी साध्या अवस्थेकडून संकीर्ण अवस्थेकडे होत असला तरी तो साध्या सरळ रेषेत झालेला नाही. त्या विकासाच्या प्रक्रियेत अनेक चढ-उतार, संघर्ष झालेले आहेत; त्यामुळे कोणत्याही प्रादेशिक समाजाच्या समाजरचनेचे, सामाजिक संबंधांचे अध्ययन करतेवेळी त्या समाजाची ऐतिहासिक पार्श्वभुमी अभ्यासणे आवश्यक आहे, असे द्वंद्वात्मकवादी समाजशास्त्रज्ञांचे मत आहे. (गजेंद्रगड/मारुलकर; उपरोक्त; पृ. ३१७)

बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "भारतीय समाजात प्रत्येक वर्ग जातिग्रस्त आहे आणि प्रत्येक जात वर्गग्रस्त आहे." भारतीय माणूस कोणत्यावेळी वर्गभान जपतो व कोणत्यावेळी जातभान जपतो याचे एक मार्मिक निरीक्षण आंबेडकरांनी नोंदविले आहे ते म्हणतात, "भारतीय माणूस आपल्यावरील अन्यायाच्या विरोधात जेव्हा स्व-जातीयांशी संघर्ष करतो तेव्हा तो वर्गीय भान जपतो. आणि जेव्हा तो अन्य जातीयांशी आपल्यावरील अन्यायाच्या विरोधात लढतो तेव्हा तो जातभान जपतो." (सुमंत, यशवंत; २००८, पृ. ८३) आंबेडकर 'जात हा एक बंद वर्ग आहे अशी व्याख्या करतात.' "क्लास हे अंतर्विवाही (Endogamous) बनल्यानंतर कास्ट बनतात" अशी तौलनिक व्याख्या ज्ञानकोशकार केतकरांनी १९०१ साली *'द हिस्ट्री ऑफ कास्ट इन इंडिया'* (खंड-१, पा.२८) मध्ये केली होती.

परंतु समकालीन समाजशास्त्रीय आकलनात जात आणि वर्ग या दोन्ही गोष्टी ठोस वास्तव नसून केवळ विश्लेषणात्मक प्रवर्ग (Categories) आहेत आणि ते इतिहासाकडे बघण्याच्या पद्धतीशास्त्राचे उत्पादमात्र आहेत असे मानण्यात आले. यावरून 'प्रमुखप्रवाही' प्रस्थापित समाजशास्त्रज्ञांचे जात आणि वर्गविषयक आकलन लक्षात येण्यास मदत होते.

१९६० आणि १९७० च्या दशकात क्षेत्रकार्य पद्धतीला महत्त्व दिल्यामुळे जातींचे संबंध आणि तिच्या गतीशीलतेचे आकलन वर्ग आणि सत्तेशी विशिष्ट प्रादेशिक संदर्भात करण्यात खुप मोठी मदत झाली. पण जातीय असमानतेच्या संदर्भात या प्रवाहाचा विचार केल्यानंतर त्याच्या मर्यादा लक्षात आल्या.

भारतातील समाजशास्त्रज्ञांना जनसामान्यांच्या दृष्टीकोनापेक्षा वेगळी अंर्तदृष्टी दाखविता आली असती पण त्यांनी जातीय असमानतेच्या पातळीवर व विषमता आणि शोषणाच्या प्रश्नावर मौन पाळण्याचे काम केले. या प्रश्नावर त्यांनी कधीही कळकळीने रस दाखविलेला नाही. याला फक्त अभ्यासकांची मनोभुमिका महत्त्वाची नाही तर त्याहीपेक्षा ज्ञानमिमांसीय बौद्धीक दृष्टीकोनही त्या विशिष्ट शाखेने स्वीकारलेला महत्त्वाचा आहे. तसेच राष्ट्रसंस्थेच्या संदर्भात ते कसा विकसित करतात हे देखील पाहणे जरूरी आहे. या पार्श्वभुमीवर विशिष्ट प्रदेशातील सामाजिक/ राजकीय संघर्ष व जात-वर्ग-लिंगभाव या चर्चा विश्वाचा आढावा घेणे महत्त्वाचे आहे. यातून ज्ञानशाखांच्या 'परिघावरील' दृष्टीकोन केंद्रस्थानी आणण्यास मदत होईल.

महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील धर्म आणि जातिव्यवस्थेचे विश्लेषण मार्क्सवादी विचारवंतांनी आणि नेत्यांनी केले नाही, केवळ वर्गविग्रहावरच भर दिला, जातीव्यवस्थेचा आचार-विचार कम्युनिस्ट आंदोलनात अभावानेच दिसला, म्हणून श्रमिकांच्या चळवळीत सहभागी कामगारांचा अर्थकारणापुरताच राहिला असा आक्षेप घेतला जातो. तशी टिकाही आजवर होत आलेली आहे. पण धर्म, लिंगभाव आणि जातीव्यवस्थेचा विचार मार्क्सवाद्यांनी केला नाही असा आक्षेप काही खरा नाही.

रावसाहेब कसबे, शरद पाटील आणि गेल ऑम्व्हेट यांनी वर्ग आणि जातवास्तवाच्या संदर्भात भारतातील मुक्तीदायी, परिवर्तनवादी राजकारणाचे स्वरुप व वळण काय असले पाहिजे या संदर्भात वैचारिक स्पष्टता दिली.

अर्वाचिन महाराष्ट्रातील जातीमीमांसेचा मार्क्सवादी विचारप्रवाह येथील साम्यवाद्यांपासून सुरू झाला व पुढे या प्रवाहाने अनेक वळणे घेत मार्क्सवादी आकलन अधिक प्रगल्भ केले. असे असले तरीही जात आणि वर्ग यांच्या सिद्धांतनाचा प्रश्न मार्क्सवादी विचारविश्वात नेहमीच वादग्रस्त राहिला आहे.

परंतु १९७० नंतर स्त्रीवादी विचारविश्वाने लिंगभाव विरहित 'जात' / 'वर्ग' याबाबतीत प्रश्न विचारले तर १९९० च्या दशकात दलित स्त्रीवाद्यांनी 'जात विरहीत लिंगभाव' या संदर्भात प्रश्न उभे करताना हे चर्चाविश्व अधिक व्यापक होण्यास मदत झाली. कारण याच काळात हिंदुत्ववादाच्या प्रभावातील अस्मितेच्या राजकारणातील सामाजिक राजकीय विचारांच्या क्षेत्रात स्त्रियांचा विचार 'आमच्या स्त्रिया विरुद्ध

तुमच्या स्त्रिया' अशा प्रकारे केल्याने या नव्या आव्हानाला अभ्यासक, विचारवंत, आणि कार्यकर्त्यांना सामोरे जाता आले.

**संशोधन अभ्यासाचा उद्देशः**

- कसबे, पाटील आणि ऑम्व्हेट या तिघांचे वेगवेगळ्या चळवळी, विचारसरणी, कार्यक्रम, धोरण आणि वादविवाद याबाबत डाव्या चळवळीला असलेले योगदान लक्षात घेताना त्यांनी मांडलेल्या सिद्धांताचे सामर्थ्य आणि मर्यादा समजून समाजशास्त्रातील जात, वर्ग आणि लिंगभाव या चर्चाविश्वाशी कसा संवाद साधला ते लक्षात घेणे.
- जात, वर्ग आणि लिंगभाव यांच्या मांडणीमध्ये विकसित झालेल्या ब्राम्हणी-अब्राम्हणी या सारख्या संकल्पनांचा आढावा घेणे.
- या तिघांनी मांडलेल्या जात आणि वर्गाच्या ऐतिहासिक विकासाचे परीक्षण करणे
- मार्क्स आणि वेबर यांनी मांडलेला वर्ग-विषयक परस्पर वेगळा विचार आणि कसबे, पाटील आणि ऑम्व्हेट यांनी मांडलेला वर्ग-विषयक विचार यांचा तुलनात्मक विचार करणे.
- मार्क्सच्या विश्लेषणात वर्ग ही संकल्पना महत्त्वाची आहे की शोषण ते लक्षात घेऊन कसबे, पाटील आणि ऑम्व्हेट यांच्या संकल्पनांचा तुलनात्मक आढावा घेणे.
- या तिघांनी भारतातील जातीचे विशिष्टत्व लक्षात घेऊन मार्क्सवादाच्या कक्षा रुंदावण्याच्या दृष्टीने 'मार्क्सवाद-आंबेडकरवाद' किंवा 'मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद' हा भारतीय समाजाच्या विश्लेषणाला सैद्धांतिक पाया देऊ शकेल काय याचा वेध घेणे.
- जागतिक भांडवलशाहीच्या सध्याच्या काळात जाती, वर्ग आणि लिंगभावाचे स्वरुप कसे बदलत आहे आणि त्यामधून कोणते प्रश्न निर्माण होत आहेत याबाबत या तिघांची मांडणी तुलनात्मक पद्धतीने समजून घेणे.

**संशोधन प्रश्न**

- वर्ग हीच एक शोषण संबंधांची सामाजिक उत्पादन संबंधांची रचना आहे काय?
- जातीव्यवस्था ही फक्त विचारसरणी, संस्कृती, धर्म या पातळीवरची सामाजिक उत्पादन संबंधांच्या पातळीवरची वर्गीय शोषणाप्रमाणेच शोषण पद्धती आहे काय?
- आजच्या काळात आलेले जातीव्यवस्थेचे स्वरुप लक्षात घेता वर्गव्यवस्थेच्या आणि पितृसत्ताक संबंधांच्या अंताची चळवळ संयुक्तपणे जातिव्यवस्थेच्या अंतासाठी करायच्या चळवळीबरोबर न करता जातिव्यवस्थेचा अंत होणे. शक्य आहे का?
- जात ही एक रचना म्हणून शरद पाटील, रावसाहेब कसबे आणि गेल ऑम्व्हेट यांनी कशी मांडणी केली आहे?
- प्रस्तुत अभ्यासकांनी जात आणि वर्गाचा परस्परसंबंध कशा प्रकारे जोडला आहे?
- जाती अंताबाबत प्रस्तुत अभ्यासकांनी काय सांगितले आहे?
- मार्क्सच्या विश्लेषणात 'वर्ग' ही संकल्पना मुख्यतत्वे महत्वाची आहे की 'शोषण' ते लक्षात घेऊन कसबे, ऑम्व्हेट, आणि पाटील यांनी कोणत्या संकल्पनेला प्रामुख्याने महत्व दिले?
- मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद हा भारतीय समाजाच्या विश्लेषणाला सैद्धांतिक पाया देऊ शकेल काय?
- ब्राह्मणी-अब्राह्मणी या संकल्पनांबाबतचे पाटील-कसबे-ऑम्व्हेट यांचे विश्लेषण काय आहे?
- भारताची इतिहासमिमांसा या तिघांनी कशी केली आहे?
- लिंगभाव या संकल्पनेबाबतचे विचार लक्षात घेणे.

जात आणि वर्ग यांचे परस्परसंबंध समजून घेऊन जात, वर्ग, व स्त्रीदास्याच्या विरोधातील संघर्षासाठीचे वैचारिक आधार निर्माण करुन त्याआधारे वैचारिक जागृती होण्यास मदत उदारीकरणाच्या व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे काही क्रांतीकारी 'सर्वहारा'च्या असणा-या अस्सल संकल्पना किंवा परिभाषा

बदलल्या जात असून तिथे नवीन संकल्पना निर्माण केल्या जात आहेत. पण सत्ताधारी वर्गाने निर्माण केलेल्या, लादलेल्या संकल्पनांना मुक्तीचे आश्वासन किंवा चेहरा असतोच असे नाही. बहुधा सत्ताधारी वर्गाने किंवा त्यांच्या वतीने राज्य करणा-या राज्यकर्त्यांनी निर्माण केलेल्या संकल्पना वा परिभाषा यामध्ये अंतिमतः मुक्तीची शक्यता नसते.

**संशोधन अभ्यासपद्धतीची चौकट (Framework) व संशोधनाचे पद्धतीशास्त्र:**

प्रस्तुत संशोधनासाठी तुलनात्मक अभ्यास पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. समाजशास्त्राची विषयसामुग्री इतकी जटील आहे की, कार्यकारण संबंधांचे स्वरुप स्पष्ट रुपात शोधणे अवघड आहे. परंतु तुलनात्मक पद्धतीतून हे अवश्य शोधले जाऊ शकते. वेगवेगळ्या संकल्पना, सिद्धांत किंवा चलाबाबतचा अभ्यासकांचा दावा पडताळून पहायचा असेल तर तुलनात्मक अभ्यास पद्धत ही महत्त्वाची ठरते. त्यामुळे प्रस्तुत संशोधन अभ्यासाकरीता या पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

ही तुलना वेगवेगळ्या आधारावर किंवा निकषावर केली जाऊ शकेल. त्यामध्ये जात आणि वर्गाचा उदय, व्याख्या, स्वरुप, तसेच जात, उपजाती व पोटजाती निर्माण होण्यास कारणीभूत असलेले घटक, वैशिष्ट्ये; वेगवेगळ्या कालखंडात जात आणि वर्गात झालेले स्थित्यंतर; जात, वर्ग, धर्म आणि लिंगभाव यातील परस्पर संबंधांचे करण्यात आलेले विश्लेषण; जात, वर्ग आणि राजकीय अर्थकारण; जात, वर्ग आणि व्यवसायातील परस्परसंबंध, तसेच प्रतिष्ठा आणि आधुनिकतेची केलेली व्याख्या किंवा आकलन, इ. मुद्यांचा समावेश होतो.

त्याचप्रमाणे या अभ्यासकांनी अवलंब केलेल्या अभ्यास पद्धतीचा सुद्धा अभ्यास करता येऊ शकेल. तसेच त्यांनी सुचित केलेल्या प्रमाणशास्त्रीय दृष्टीकोनांचा अभ्यास देखील करता येईल. ब्राम्हणी, अब्राम्हणी आणि स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून करण्यात आलेली जातीमिमांसा आणि मार्क्सवादी विचार प्रणालीतून करण्यात आलेल्या जाती मिमांसेतील फरक समजून घेता येईल. तसेच जात, वर्ग आणि पुरुषसत्ताअंताचे या वेगवेगळ्या विचारप्रणालीतून मांडण्यात आलेले सिद्धांतन तपासता येईल.

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. या संशोधनाकरीता पाटील, ऑम्व्हेट आणि कसबे यांनी केलेले ग्रंथ लेखन, दिलेली भाषणे, पत्रे, लेख त्याचसोबत इतरांनी त्यांच्या विचारावर केलेली मांडणी यांचा उपयोग करण्यात येईल.वरील उदिष्ठांच्या अनुषंगाने संबंधित माहिती मिळविण्याच्या संदर्भात माहिती असलेल्या संबंधित संस्था व व्यक्तीकडून प्रसंगी चर्चेच्या माध्यमातून प्राथमिक माहिती मिळविली जाईल .या व्यतिरिक्त अभ्यासासाठी पूरक अशी माहिती ज्या ज्या स्त्रोतातून मिळेल त्यांचा ही संशोधनासाठी आधार घेतला जाईल .

**संशोधन विषयाबाबतच्या साहित्याची प्राथमिक पाहणी:**

***महाराष्ट्रातील जात-वर्ग-लिंगभावविषयक अभ्यासः रावसाहेब कसबे, शरद पाटील, गेल ऑम्व्हेट***

जात आणि वर्ग या दोन संकल्पना व त्याभोवतीचा मानवी व्यवहार कमालीचा गुंतागुंतीचा आहे. अनेक विद्वानांना जात आणि वर्ग हे सारखेच वाटले आहेत. काहींनी तर लिंगभावाचा विचारच केला नाही.

महादेव गोविंद रानडे. जात व वर्ग संकल्पना पर्यायवाची वापरतात. (रानडे, एम.जी. *'एसेज ऑन अर्ली इकॉनॉमिक्स'*, पृ. ३१४-३१५) त्यांचा पहिला अर्थपूर्ण उपयोग एस. व्ही. केतकरांनी केला. ते १९०१ साली लिहितात की, वर्ग अंतर्गत विवाही झाल्यानंतर जाती बनतात. (केतकर, एस. व्ही. *'द हिस्ट्री ऑफ इंडिया'*, खंड-१ पृ. २८) तर ई. एम. एस. नंबुद्रीपाद यांनी 'वर्गाचाच जात या मुख्य रुपात अविष्कार होतो', अशा मार्क्सवादी परिभाषेत विचार मांडला आहे. (भट्ट, अनिल; *'कास्ट, क्लास अँड पॉलिटिक्स'*, पृ. २३) भारताबद्दल मार्क्सने १८५३ साली घोषणा केली की, आधुनिक उद्योगधंद्यांच्या विकासापोटी उद्‌भवलेल्या नव्या वर्ग लढ्यातून जन्मसिद्ध जाती नष्ट होतील. (दत्त, आर. पी. *'इंडिया टुडे'* पृ. २४४) डी. डी. कोसंबी या मार्क्सवादी इतिहासकाराने देखील जातीला वर्गाबरोबर मानले ते

निःसंदिग्धपणे म्हणतात, ‘‘जात ही आदिकाळातील (सामाजिक विकासाच्या) उत्पादनाच्या पातळीवर वर्गच आहे. (कोसंबी, डी. डी. (१९८८), *ॲन इंट्रोडक्शन टू द स्टडी ऑफ इंडीयन हिस्ट्री*, पॉप्युलर प्रकाशन, बॉम्बे पृ. १३)

असे असले तरीही अर्वाचीन महाराष्ट्रातील जातिमीमांसेचा मार्क्सवादी विचारप्रवाह येथील साम्यवाद्यांपासून सुरू झाला व पुढे या प्रवाहाने अनेक वळणे घेत मार्क्सवादी आकलन अधिक प्रगल्भ केले. इ. स. १९७५ नंतर महाराष्ट्रातील मार्क्सवादी विचारांत काही नवीन प्रवाह निर्माण झाले. स्वातंत्र्यानंतर भारतीय समाजात व विविध समाजगटांत झालेल्या चळवळींचा विचार जात व वर्ग अशा दोन्ही दृष्टीकोनातून करायला हवा व त्यावरूनच कुठल्याही चळवळीचे समाजाच्या विकासातील नेमके योगदान ठरले पाहिजे, असा विचार नलिनी पंडित यांनी त्यांच्या ‘*जातवाद व वर्गवाद*’ या पुस्तकात मांडला आहे. या पुस्तकात त्या ‘जातीयवाद’ या शब्दापासून भिन्न अर्थाचा ‘जातवाद’ हा शब्द वापरतात. जातींवर आधारित चळवळींमधून शोषित जातींचे व त्यांच्या अधिकाराचे प्रश्न मांडले जात असतील तर अशा चळवळींना प्रगतीशील समजले पाहिजे असे मत त्या मांडतात. या पुस्तकात त्यांनी ब्राम्हणेत्तर चळवळ, सत्यशोधक चळवळ दलित चळवळ या चळवळींवरील दृष्टीकोनातून विश्लेषण केले आहे. यातून नलिनी पंडितांची मौलिक अभ्यासदृष्टी आणि वास्तवाचा शोध घेण्यासाठी आवश्यक असलेली स्वतंत्र दृष्टी व्यक्त होते.

एका अर्थाने त्या वर्गवादी वा वर्ग समन्वयवादी बंदिस्त चर्चाविश्वाला छेदून जातीच्या घटकांचे महत्त्व प्रतिपादन करणा-या भारतातील त्या पहिल्या राजकीय विश्लेषक ठरतात. महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास आणि वर्गवाद व जातवाद या त्यांच्या मौलिक कृती आहेत. जातिव्यवस्थेची भुमिका नव्या वर्गव्यवस्थेत कोणत्या प्रकारे कृतीशील असते हे त्यांनी प्रथम अधोरेखित केले. पारंपारिक ब्राम्हण, मराठा, दलित नव्या वर्ग व्यवस्थेत कोणते जाती हितसंबंध घेऊन उभे राहतात यांचा शोध नलिनी पंडीत यांनी पुढे आणला. त्यांच्या या विश्लेषण पद्धतीमुळे पारंपारिक मार्क्सवाद आणि गांधीवादी समाजवाद या दोन्हींच्या वैचारिक आधारावर मौलिक टिकेला प्रारंभ झाला.

नलिनी पंडितांचे योगदान त्यांनी समकालीन वर्गस्थितीची दखल तिच्या जातीय अंगांसह घेतली; दुस-या बाजूला दलितेत्तर डाव्या चळवळी, समाजवादी प्रवाह प्रबळ होता. समाज परिवर्तनाच्या आघाडीवर समतेसाठी संघर्ष देण्याची प्रेरणा तो अधोरेखित करीत होता. अशा काळातील नलिनी पंडितांनी डाव्या चळवळीवरील गांधीवादातून येणा-या गुढवादाची चिरफाड केली. समाजवादी चळवळ आणि राष्ट्र सेवा दलाच्या विचारसरणीवर गांधीवादी समाजवादी संघटनांचा राष्ट्रवाद हा अंतिमतः अध्यात्मवादी आणि वर्गसमन्वयवादी आहे असे नलिनी पंडीत यांनी पुढे आणले. अध्यात्मवादी विचारप्रणालीमुळे समाजवादी संघटनांची कार्यक्रम पत्रिका दलित, आदिवासी आणि शोषित वर्गाच्या शोषण व्यवस्थेमागील, भौतिक उत्पादन साधनांची दखल घेऊ शकले नाहीत. त्यामुळे त्यांचे कार्यक्रम कर्मकांडवादी आणि भावनाप्रधान प्रतिकवादी बनले. शोषणाच्या भौतिकतेमुळे असलेल्या व्यवस्थेसंदर्भात कार्यक्रम पत्रिका सादर होऊ शकली नाही.

पण १९७० च्या दशकात नवमार्क्सवादाचा प्रभाव वाढत होता त्याच काळात सुधीर बेडेकर आणि त्यांच्या सहका-यांनी प्रथम ‘*मागोवा*’ आणि नंतर ‘*तात्पर्य*’ या नावाने नियतकालीक काढले. याच काळात दलित पँथर, नक्षलवादी चळवळ, युवक क्रांती दल इ. चळवळींचा उदय लक्षात घेता यामधून अनेक व्यवस्थापरिवर्तनवादी अशी राज्यव्यापी लढाऊ विचारवंत-कार्यकर्त्यांचा उदय झाला.

१९७५ च्या दशकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात जात-वर्ग अनुबंधाची तसेच पाया आणि इमला यांच्या परस्परसंबंधांची पुन्हा एकदा जोरकस चर्चा झाली. वर्ग-जातीचे अनेक आयाम नव्याने पुढे आले. गं. बा. सरदार, वसंत पळशीकर, शरद पाटील, गेल ऑम्व्हेट, भारत पाटणकर, रावसाहेब कसबे, सुधीर

बेडेकर यांची वैचारिक मांडणी, दलित पँथर, स्त्री चळवळ आणि शेतकरी चळवळीमुळे ढवळून निघालेले विचारविश्व नव्या सामाजिक सिद्धांतनाची शक्यता ध्वनित करीत होते. यातून परिवर्तनवादी शक्तींची एकजुट सिद्ध होईल अशी उमेद निर्माण झाली होती.

परंतु याच काळात दलित पँथरच्या चळवळीत 'मार्क्स की आंबेडकर?' असा 'प्रश्न' निर्माण झाला आणि या चळवळीला तडे गेले आणि ज्या गतीने पँथरची चळवळ निर्माण झाली होती शेवटी त्याच गतीने ती ताणतणावातच लयाला गेली. त्यामुळेच रावसाहेब कसबे यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर त्यांच्या विचारांचा नव्या परिस्थितीत योग्य अर्थ लावून 'आंबेडकरवाद' म्हणून एक सुत्रबद्ध दृष्टीकोन मांडला. तसेच त्यांचे '*झोत*' आणि '*आंबेडकर आणि मार्क्स*' हे ग्रंथ त्या दृष्टीने पथदर्शक राहिले आहेत. रावसाहेब कसबे म्हणतात, "भारतातील जातीसंस्थेला आर्थिक पाया आहे की जातीसंस्थेचे अस्तित्व आर्थिक प्रश्नाहून भिन्न आहे, हा एक विवाद्यच्या प्रश्न आहे. परंतु या विवाद्य प्रश्नाच चर्चेला सुरुवात होणे आवश्यक आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीसंस्था पूर्णपणे आर्थिक पायावर उभी होती असे मानले नाही. परंतु आधुनिक काळातील जातिसंस्थेत निर्माण झालेल्या आर्थिक पदरांचेही त्यांना भान होते. राज्यघटनेने केवळ राजकीय ढाचा ठरवून उपयोगांचे नाही तर समाजवादी अर्थव्यवस्थेला सुद्धा घटनात्मक विधीनियमांचे स्वरुप दिले पाहिजे, ही आंबेडकरांची भारतीय राज्यघटनेबद्दलची आग्रही भुमिका याचे द्योतक आहे असे मला वाटते. जातीसंस्थेचा प्रमुख आधार सामाजिक राजकीय की आर्थिक याबद्दल उलट-सुलट चर्चा केली तर ती होऊ ही शकेल. आजची विषम अर्थव्यवस्था सामाजिक विषमतेला अधिक घट्ट करताना स्पष्ट दिसते आहे हे कोणी नाकारू शकेल काय? (कसबे, रावसाहेब; '*डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना*' पृ. १२०)

तर शरद पाटील यांच्या 'मार्क्सवाद-फुले आंबेडकरवाद' उदय विकासाचा प्रारंभ रावसाहेब कसबे, बाबुराव बागुल, य. वा. वडस्कर यांच्या वैचारिक प्रबोधनकार्यांनी होतो. शरद पाटील यांचा 'मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद', ही या काळातील सशक्त अशी दार्शनिक झेप होती. 'माफुआ' आधारेच इतिहास, प्राच्यविद्या, संस्कृती, आणि साहित्य या क्षेत्रातील पुनर्रचनेचे कार्य शरद पाटील बजावतात.यावरून असे लक्षात येते की, "डाव्या चळवळीचे बरेचसे अरिष्ट वर्ग आणि जात या प्रवर्गाचा द्विविभाजीत विचार करण्यातून उद्‌भवते. इतिहासाच्या द्वंद्वात्मकतेत (Dialecticss) सामाजिक वर्ग हा पायाभूत एकक असल्याने सुरुवातीला साम्यवाद्यांचा जातींना मिथ्या मानून त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याचा आणि भारतीय वास्तवाला पाश्चिमात्य देशातील वर्गाच्या अंगाने बघण्याचा कल होता. त्यावेळेस जातीव्यवस्थेचे बळी असलेल्यांनी जाती जुलूमाच्या वरवरच्या वास्तवाला अवास्तव महत्त्व देऊन त्यामागील बहुदिशात्मक शोषण प्रक्रियांना ज्यांचा दडपशाही विरुद्ध मुक्तीसंघर्षाच्या उभारणीसाठी वापर केला जाऊ शकत होता," (तेलतुंबडे, आनंद; २००७; पृ. १२५) ही टिका महाराष्ट्रातील अब्राम्हणी मार्क्सवादी विचारसरणीला कितपत लागू होऊ शकते याबाबत शंका आहे.

थोडक्यात, रावसाहेब कसबे, शरद पाटील, आणि गेल ऑम्व्हेट या तिघांनीही अब्राम्हणी मार्क्सवादी परिप्रेक्ष्यातून मराठी आणि भारतीय समाजापुढील कळीच्या तात्विक आणि सामाजिक प्रश्नांचा सखोल वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या सामाजिक राजकीय विश्वात परिघावर वावरणा-या डाव्या लोकशाहीवादी राजकारणाशी जैविक नाळ जोडत या वर्तुळात वावरणा-या कार्यकर्त्यांचे, अभ्यासकांचे दीर्घकाळ प्रबोधन करीत आहेत. राजकारणाच्या व्यवहारात हस्तक्षेप करीत असतानाच अभ्यासक व चळवळीतले कार्यकर्ते यांच्यातील अंतराचे भान राखत; संशोधनाची शिस्त पाळत असतानाच सामाजिक वास्तवापासून दूर न राहता त्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करीत आहेत.

या तिघांच्या वैचारिक योगदानासंबंधीचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे आपल्या अभ्यासासाठी त्यांनी केलेली विषयांची निवड आधुनिक जडण-घडणीबरोबरच त्यांचे अभ्यासविश्वही उलगडत गेले. असे मानले तर या काळातील मार्क्सवादी आणि भारतातील पुरोगामी राजकारणापुढे उपस्थित झालेल्या सर्व महत्त्वाच्या वैचारिक प्रश्नांची चर्चा त्यांनी आपल्या लिखाणात केलेली दिसते.

सारांश, या तिघांनी वर्ग आणि जातवास्तवाच्या संदर्भात भारतातील मुक्तीदायी, परिवर्तनवादी राजकारणाचे स्वरुप व वळण काय असले पाहिजे यासंदर्भात वैचारिक स्पष्टता दिली. परिणामतः जात, वर्ग आणि लिंगभाव या तिन्ही शोषण शासनाच्या व्यवस्थांविरोधात एकाच वेळी संघर्ष उभा करण्याची क्षमता निर्माण झाली. त्यामुळे कसबे, पाटील, आणि ऑम्व्हेट यांनी उभे केलेले सैद्धांतिक आव्हान यांच्या दबावामुळे मार्क्सवाद्यांच्या विविध पक्ष संघटनांनी प्रथम वर्ग संघर्ष जातिअंताचाही संघर्ष आहे असे म्हणायला सुरुवात केली. आणि मग पुढे जाऊन कामगार शेतकरी या बरोबरच दलित आदिवासी, ओबीसी, स्त्रिया या सुद्धा क्रांतीच्या शक्ती आहेत असेही मांडायला सुरुवात केली आहे. आणि १९७० च्या काळातील जात की वर्ग, ८० च्या काळातील वर्ग का लिंगभाव आणि ९० च्या काळातील लिंगभाव की जात या द्वैतातून बाहेर पडण्याचा मार्ग निर्माण झाला. म्हणून या तिघांच्या लेखनाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून तुलनात्मक पद्धतीने अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

**संशोधन अभ्यासाचे महत्त्वः**

पारंपारिक मार्क्सवादी अभ्यासकांनी केलेली जात आणि वर्गविषयक मिमांसा आणि शरद पाटील, गेल ऑम्व्हेट आणि रावसाहेब कसबे यांनी केलेली मार्क्सवादी विचारप्रवाहातील अब्राम्हणी मिमांसा यांच्या मांडणीतील तुलनात्मक फरक समजण्यास मदत होऊ शकेल.जात वर्ग, लिंगभाव आणि धर्माचे मार्क्सवादी विचारप्रवाहातील अब्राम्हणी आकलनाच्या दिशा आणि परस्पर संबंध स्पष्ट होऊ शकेल.

मार्क्सवादी विचारप्रवाहातील जातीचा सखोलपणे अभ्यास अधोरेखित होऊ शकेल.भारतातील सामाजिक-राजकीय संघर्षाचे स्वरुप समजण्यास मदत होण्यासोबतच जात-वर्ग-स्त्रीदास्यांताच्या तत्वज्ञानाचा पाया समजून घेण्यास पुरक ठरेल .

आजच्या नवभांडवलशाहीच्या काळात जात आणि वर्गाचे स्वरुप कसे बदलत आहे व त्यातून कोणते प्रश्न निर्माण होत आहेत ते लक्षात घेता येईल.जागतिकीकरण आणि मंडलआयोगाच्या काही शिफारशींची अंमलबजावणी ही जर गेल्या दोन दशकांची वैशिष्ट्ये मानली तर त्या पार्श्वभुमीवर कोणती राजकीय स्थित्यंतरे होत आहेत, झाली आहेत याचे आकलन होण्यास उपयुक्त.

प्रस्तुत अभ्यासातून वेगवेगळ्या चळवळी आणि राष्ट्रवाद यांच्यात निर्माण झालेला गतीरोध समजूनघेता येईल.प्रमुखप्रवाही समाजशास्त्रातील जातिविषयक सिद्धांतांची चिकित्सा करण्यास उपयोगी.

प्रादेशिक भाषेत मांडलेले अभ्यास किंवा संशोधन हे देखील अनेकवेळा राष्ट्रीय पातळीवरचे असते. त्याचा दर्जा काहीवेळा तर राष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध होणा-या अभ्यासापेक्षाही गुणवत्तापूर्ण आणि सकस असतो ते दाखविता येईल.समाजशास्त्रातील जात-वर्ग आणि लिंगभावविषयक विचाराच्या विकासात पुरक ठरु शकेल.

**अभ्यासाची चिकित्साः**

रावसाहेब कसबे, शरद पाटील आणि गेल ऑम्व्हेट यांच्या अभ्यासाची चिकित्सा प्रदीप गोखले, महेश गावस्कर, नलिनी पंडित, विलास सोनावणे, नंबुद्रीपाद, बी.टी. रणदिवे, श्रीपाल सबनीस, मे. पु. रेगे, सुधीर बेडेकर, मोतीराम कठारे, सुहास पळशीकर, यशवंत सुमंत, सदानंद मोरे, उमा चक्रवर्ती, भारत पाटणकर, आनंद तेलतुंबडे यासाख्या अभ्यासकांनी केली आहे.

**प्रस्तुत संशोधन प्रकरणांचा आराखडाः-**

प्रकरण-१ प्रस्तावना

प्रकरण-२ संदर्भ साहित्याचा आढावा व संशोधनाचे पद्धतीशास्त्र

प्रकरण-३ रावसाहेब कसबे यांचे जात, वर्ग आणि लिंगभाव विषयक विचार

प्रकरण-४ शरद पाटील यांचे जात, वर्ग आणि लिंगभाव विषयक विचार

प्रकरण-५ गेल ऑम्व्हेट यांचे जात, वर्ग आणि लिंगभाव विषयक विचार

प्रकरण-६ महाराष्ट्रातील जात, वर्ग आणि लिंगभाव विषयक तुलनात्मक अभ्यास

प्रकरण-७ निष्कर्ष

## संदर्भ सूची

मराठी / हिंदी पुस्तके आणि लेखः


१. आंबेडकर, बी. आर. (१९७४ द्वि.आ.) 'शुद्र पूर्वी कोण होते?' अनु. चांगदेव खैरमोडे, सुगत प्रकाशन, नागपूर.

२. आंबेडकर, बी. आर. (१९७६ द्वि.आ.) 'भारतातील जाती, अनु. गांजरे महेंद्र, अशोक प्रकाशन, नागपूर.

३. आगलावे, प्रदीप (१९९५), 'पाश्चात्य आणि भारतीय समाजशास्त्रज्ञ,' साईनाथ प्रकाशन, नागपूर.

४. ऑरॉं, रेमंड (२००१) 'समाजशास्त्रीय विचारातील प्रमुख प्रवाह,' इंग्रजी भाषांतर-रिचर्ड हॉवर्ड आणि हेलन वीव्हर, मराठी अनु. हेमकांत बेंकटेश बलकुंदी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

५. ऑम्व्हेट, गेल (१९८१), 'जातिव्यवस्थेविषयीचा एक दृष्टीकोन,' (लेख) 'तात्पर्य', संपा. सुधीर बेडेकर, पुणे.

६. ऑम्व्हेट, गेल, (१९९३), 'डंकेल प्रस्ताव व अमेरिकन साम्राज्यवाद,' समाज प्रबोधन पत्रिका, अंक-१२२, जाने-मार्च-१९९३

७. ऑम्व्हेट, गेल, (१९९५), 'वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड,' अनु. दिघे, पी. डी. सुगावा प्रकाशन, पुणे-३०

८. ऑम्व्हेट, गेल, (१९९८), 'जात, वर्ग आणि लिंग/पितृसत्ता,' भाषांतर जीनत खान, अब्राम्हणी' स्त्रीवादी इतिहासलेखनाच्या दिशेने, संपा.-विद्युत भागवत, प्रतिमा परदेशी, प्रकाशन-स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, आणि क्रांतीसिंह नाना पाटील अकादमी,
पुणे-११

९. ऑम्व्हेट, गेल, (२००९ स.आ.), 'ज्योतीबा फुले आणि स्त्रीमुक्तीचा विचार,' लोकवाङःमय गृह, मुंबई.

१०. ऑम्व्हेट, गेल, (२००८), 'आंबेडकर आणि नंतरः भारतातील दलित चळवळ' (लेख) 'दलितांची अस्मिता आणि राजकारण', संपा. घनश्याम शहा, अनु. सुनंदा कोगेकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-३०

११. ऑम्व्हेट, गेल, (२००८), 'दलित आणि आर्थिक धोरणः डॉ. बी. आर. आंबेडकरांचे लेख' (लेख), 'आधुनिक भारतातील दलित दृष्टीकोन आणि मुल्ये,' संपा.- एस. एम. मायकेल, अनु. विद्या भाके, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-३०

१२. बगाडे, उमेश (२००६), 'महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्गजातिप्रभुत्व,' सुगावा प्रकाशन, पुणे-३०

१३. बगाडे, उमेश (२००२), 'फुले-आंबेडकरांचा राष्ट्रवाद', क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले प्रकाशन, येवले.

१४. बेडेकर, सुधीर (१९८१), 'पुन्हा एकदा वर्ग जातिसंघर्षवाद का वर्गसंघर्षवाद', 'तात्पर्य,' संपा-सुधीर बेडेकर, जुन-१९८१, पुणे.

१५. कसबे, रावसाहेब (२००२), 'शिक्षणाची आव्हाने,' सुगावा प्रकाशन, पुणे-३०

१६. कसबे, रावसाहेब (१९७७), डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना,' सुगावा प्रकाशन, पुणे-३० (तृ.आ. २००१)

१७. कसबे, रावसाहेब (१९७८), 'झोत', सुगावा प्रकाशन, पुणे-३० (स.आ. २००२)

१८. कसबे, रावसाहेब (१९८२), 'दलित चळवळीची वाटचाल,' सुगावा प्रकाशन, पुणे-३०

१९. कसबे, रावसाहेब (१९८५), 'आंबेडकर आणि मार्क्स,' सुगावा प्रकाशन, पुणे-३० (दु.आ. २००६)

२०. कसबे, रावसाहेब (१९८९), 'आंबेडकरवादः तत्व आणि व्यवहार,' सुगावा प्रकाशन, पुणे-३०

२१. कसबे, रावसाहेब (१९९४), 'हिंदू-मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदु राष्ट्रवाद,' सुगावा प्रकाशन, पुणे-३०

२२. कसबे, रावसाहेब (१९९५), 'विसाव्या शतकातील परिवर्तनवादी सामाजिक चळवळींची फलश्रुती,' विचारवेध संमेलन अध्यक्षीय भाषणे,' डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा.

२३. कसबे, रावसाहेब (१९९६), 'मानव आणि धर्मचिंतन,' सुगावा प्रकाशन, पुणे-३० (दु.आ. २००८)

२४. कसबे, रावसाहेब (२०००), 'समताः विचार, व्यवहार आणि भवितव्य,' दादासाहेब रुपवते स्मृतीग्रंथ, प्रकाशन-प्रेमानंद रुपवते.

२५. कसबे, रावसाहेब (२००५), 'बुद्ध धम्म आणि भारतीय समाजक्रांती,'

२६. कसबे, रावसाहेब (२००३), 'मराठी भाषेच्या उज्ज्वल भविष्यासाठी,' सुगावा प्रकाशन, पुणे-३०

२७. कसबे, रावसाहेब आणि विजय खरे (संपा.) (२००७), 'कांशिराम यांचे जीवनकार्यः चर्चासत्र अहवाल' भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे-७

२८. कसबे, रावसाहेब (२००८), 'धर्मग्रंथ आणि मानवी जीवनप्रवाह,' सुगावा प्रकाशन, पुणे-३०

२९. कुंभार, नागोराव/आनंद अनभुले (१९९९), 'महाराष्ट्रातील समाजशास्त्रीय चिंतन,' प्रकाशन-संयोजक, मराठी समाजशास्त्र परिषद महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

३०. कांबळे, संजयकुमार (२००६), 'डॉ. जी. एस. घुर्ये व डॉ. बी. आर. आंबेडकरांचे जातिविषयक विचारः एक तुलनात्मक अभ्यास,' एम. फिल (समाजशास्त्र) पदवी परीक्षेसाठी सादर केलेला लघुशोधप्रबंध (अप्रकाशित) पुणे विद्यापीठ, पुणे-७

३१. कांबळे, उत्तम (संपा.) (२००५), 'झोतः सामाजिक न्यायावर,' प्रा. डॉ. रावसाहेब कसबे गौरव समिती, संगमनेर, महाराष्ट्र

३२. केतकर, श्री. व्यं. (१९९४); 'भारतीय समाजशास्त्र,' वरदा बुक्स, पुणे-१६

३३. उम्मेन, टी. के; (२००८), 'भारतीय समाजातील समस्या व वाद' मराठी अनु-संगीता फाटक / तुलशीदास फाटक, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-३०

३४. तेलतुंबडे, आनंद (२००७), 'सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण,' लोकवाड.मयगृह प्रकाशन, मुंबई-२५

३५. दळवी म. य. (१९९४), 'डॉ. राम मनोहर लोहिया यांचे वैचारिक योगदान,' कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद-३

३६. देसाई, ए. आर. (२००६), ' भारतीय राष्ट्रवाद की सामाजिक पृष्ठभुमी,' मॅकमिलन इंडीया लिमिटेड, नवी दिल्ली.

३७. देशमुख, प्रकाश/माई देशमुख (संपा.) (१९९७), 'धर्म-जातीसंस्थाः वेध आणि भेद,' लेखक-मधू शेटये, माध्यम प्रकाशन, परिवर्तन प्रकाशन, मुंबई.

३८. दुबे, अभयकुमार (संपा.), (२००५), 'आधुनिकता के आईने में दलित,' वाणी प्रकाशन प्रा. लि., नई दिल्ली-०२

३९. धनागरे, डी. एन. (२००५), 'संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव,' प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०

४०. पळशीकर, सुहास, (२००४), 'समकालीन भारतीय राजकारणः काँग्रेस वर्चस्व ते हिंदू-जमातवाद,' प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०

४१. पाटील, शरद (१९७८), 'सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे धोरणात्मक निवेदन,' सत्यशोधक मार्क्सवादी प्रकाशन, पुणे

४२. पाटील, शरद (१९८२), 'दास-शुद्रांची गुलामगिरी,' खंडः भाग-१ प्राज्ञ प्रकाशन, वाई, जि. सातारा. मावळाई प्रकाशन, (दु.आ.) शिरुर जि. पुणे. (२००८)

४३. पाटील, शरद (१९८७), 'दास-शुद्रांची गुलामगिरी,' खंड-१ भाग-२, प्राज्ञ प्रकाशन, वाई.

४४. पाटील, शरद (१९८९), 'अब्राम्हणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र,' सुगावा प्रकाशन, पुणे-३०

४५. पाटील, शरद (१९९३), 'मार्क्सवादः फुले-आंबेडकरवाद,' सुगावा प्रकाशन, पुणे-३०

४६. पाटील, शरद (१९९९), 'बुद्धः भारतीय इतिहासातील लोकशाही, स्वातंत्र्य व समतेचा अग्निस्त्रोत!' सावित्रीबाई फुले प्रकाशन, येवला.

४७. पाटील, शरद (२००३), 'जातिव्यवस्थाक समिती सेवकत्व,' खंड-२, सुगावा प्रकाशन, पुणे

४८. पाटील, शरद (२००३), 'जात्यन्तक भांडवलदारी लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पूर्ती,' सुगावा प्रकाशन, पुणे-३०

४९. पाटील, शरद (२००५), 'शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत्रु कोणः महंमदी की ब्राम्हणी,' खंड-२, भाग-२, मावळाई प्रकाशन, शिरुर

५०. पाटील, शरद (२००५), 'रामायण-महाभारतातील वर्णसंघर्ष' मावळाई प्रकाशन, शिरुर जि. पुणे

५१. पाटील, शरद गौतमीपुत्र कांबळे (२००५), 'नवबौद्ध धम्म आणि जातिसंघर्ष,' क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले प्रकाशन, धुळे

५२. पाटील, शरद (२००७), 'भारतीय मागासलेपणाचा पाया 'वर्ग' की 'जात'? आरक्षणविरोधी प्रतिक्रियेला उत्तर, क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, अहमदनगर.

५३. पाटील, शरद (२००८), 'शोध-मुलनिवासींचा की शुद्र वर्णाचा की जात्यन्तक समतेचा?,' मावळाई प्रकाशन, शिरुर जि. पुणे.

५४. पंडित, नलिनी (१९९६), 'आंबेडकर,' ग्रंथाली प्रकाशन, मुंबई-२८ पुनर्मुद्रन-२००५

५५. पंडित, नलिनी (१९९४,१९७८), 'जातवाद आणि वर्गवाद,' ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

५६. पंडित नलिनी, (२०००), 'महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास,' ग्रंथाली प्रकाशन, मुंबई-२८

५७. पाटणकर, रा. भा. (१९९९), 'अपुर्ण क्रांती,' मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४

५८. पाटणकर, भारत (२००५), 'जातिव्यवस्थेचा अंत,' श्रमिक मुक्ती दल आणि क्रांतिवीर बाबुजी पाटणकर लोकशास्त्रीय संशोधन आणि प्रबोधन संस्था, कासेगाव.

५९. पाटणकर, भारत (२००३), 'महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष,' लोकवाङःमयगृह प्रकाशन, मुंबई-२५

६०. पाटणकर, भारत आणि इतर, 'खेड्यातील गरीबांची झुंज,' शोषित शेतकरी कष्टकरी कामगार मुक्तीसंघर्ष, क्रांतिसिंह मुक्त व्यासपीठ, विटा

६१. प्रधान, ग. प्र./रा. ग. जाधव (संपा.) (२००७), 'निवडक ग्रंथसंचः खंड-६, 'सामाजिक व सांस्कृतिक,' साधना प्रकाशन, पुणे-३०

६२. भोसले, नारायण, (२००८), 'महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणावादाचे सत्ताकारण,' (१८४८-१९५६), द ताईची प्रकाशन, पुणे-२

६३. भोसले, भा. ल./ किशोर बेडकीहाळ (२००६), 'शतकांतराच्या वळणावर,' विचारवेध संमेलनातील निबंधांचा संग्रह,' डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा.

६४. भागवत विद्युत आणि प्रतिमा प्रकाशन (संपा.) (१९९८), 'अब्राम्हणी स्त्रीवादी इतिहासलेखनाच्या दिशेने', स्त्री अभ्यास केंद्र आणि क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, पुणे-११

६५. भिर्डीकर, उर्मिला, 'पितृसत्ता- स्त्रीवाद विचार,' भाषांतरीत लेखसंग्रह, आलोचना प्रकाशन, पुणे.

६६. मंगुडकर, मा. प. (संपा.) (१९७४), 'बदलत्या महाराष्ट्राचे स्वरुप,' पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे-३०

६७. मुरुगकर, लता (१९९५), 'दलित पँथर चळवळ,' सुगावा प्रकाशन, पुणे-३०

६८. मायकेल, एस. एम. (संपा.) (२००८), 'आधुनिक भारतातील दलितः दृष्टिकोन आणि मुल्ये,' अनु. विद्या भाके, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-३०

६९. गायकवाड, जयदेव (२००७), 'जातिभेदाचे अंतःप्रवाह' पद्मगंधा प्रकाशन, पुणे-३८

७०. जोगदंड, पी. जी. (२००६) 'दलित चळवळः सिद्धांत आणि व्यवहार,' प्रतिशब्द प्रकाशन, मुंबई-६४

७१. जोशी, शरद (१९९८), 'स्वातंत्र्य का नासले?' प्रकाशन-रेणुका प्रकाशन, परभणी.

७२. घुर्ये, जी. एस. (१९९१), 'जाति, वर्ग और व्यवसाय,' राजपाल अँड सन्स, दिल्ली.

७३. सुमंत, यशवंत आणि द. दी. पुंडे (१९८८-२००६), 'महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार,' प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०

७४. सिंहल, एस. सी. (२००५), 'राजनीतीक समाजशास्त्र,' लक्ष्मीनारायण अग्रवाल-प्रकाशक, आग्रा-२

७५. सेन, अमर्त्य, (२००८), 'वाद-संवाद प्रिय भारतीय,' पेंग्वीन बुक्स इंडीया, यात्रा बुक्सच्या सहकार्याने प्रकाशित, मराठी अनु. शारदा साठे

७६. सबनीस, श्रीपाल (१९९१), 'ब्राम्हणी सत्यशोधक,' प्रकाशक- सौ. नंदीनी तु. गवळी, सम्राटनगर, सागरमाळ, कोल्हापूर-०८

७७. सुराणा पन्नालाल/किशोर बेडकीहाळ, (संपा.), (१९८८), 'आजचा महाराष्ट्र,' श्रीविद्या प्रकाशन, पुणे-३०

७८. शहा, घनश्याम (२००८), 'दलितांची अस्मिता आणि राजकारण,' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-३० अनु. सुनंदा कोगेकर

७९. शहा, घनश्याम (२००८), 'भारतातील सामाजिक चळवळी,' मराठी अनु. प्राची चिकटे, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-३०

८०. शहा, घनश्याम (२००९), 'सामाजिक चळवळी आणि सरकार,' मराठी अनु-प्रा. योगिनी वेंगुर्लेकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-३०

८१. श्रीनिवास, एम. एन. (२००४), 'आधुनिक भारत में जाती,' राजकमल प्रकाशन, प्रा. लि., नई दिल्ली-०२

८२. टिकेकर, अरुण (२००१), 'सारांश', श्रीविद्या प्रकाशन, पुणे-३०

८३. टिकेकर, अरुण (२००१), 'कालमिमांसा,' श्रीविद्या प्रकाशन, पुणे-३०

८४. व्होरा, राजेंद्र (संपा.), 'आधुनिकता आणि परंपराःएकोणीसाव्या शतकातील महाराष्ट्र, प्रा. य. दी. फडके गौरव ग्रंथ, प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०

८५. वेबर, मॅक्स (१९८६), 'धर्माचे समाजशास्त्र,' अनु. नरेश परळीकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

८६. वाघमारे, वसंत (२००६), 'जातिव्यवस्था-निर्मिती आणि स्वरुप,' सुगावा प्रकाशन, पुणे-३०

८७. रणसुभे, विलास (संपा.) (२००८), 'जात-वर्ग व परिवर्तनाचा लढा,' लोकवाङःमयगृह प्रकाशन, मुंबई.

८८. रेगे, मे. पु. (२००२), 'विवेक व न्यायः आधुनिक महाराष्ट्रातील प्रबोधन पर्व,' प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०

८९. रेगे, मे. पु. (२००५), 'स्वातंत्र्य, समता आणि न्याय,' प्रकाशन-शांता मेघश्याम रेगे, मुंबई-५, वितरक-मौज प्रकाशन गृह मुंबई-४

९०. लिंबाळे, शरणकुमार (१९९२), 'भारतीय दलित पँथर,' प्रकाशक-नंदीनी तु. गवळी. सम्राटनगर, सागरमाळ, कोल्हापूर-०८

९१. लोहिया, राममनोहर (१९९३), 'इतिहासचक्र,' संकलन/अनुवाद-श्रीपाद केळकर इंदुमती केळकर, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे-२

९२. लोहिया, राममनोहर (१९९३), 'मार्क्सनंतरचे अर्थशास्त्र,' अनु-इंदुमती केळकर, प्रेस्टिज प्रकाशन, पुणे-२

९३. लोहिया, राममनोहर (१९९३), 'समाजवाद-काळा-गोरा,' संकलन व अनुवाद-श्रीपाद केळकर/इंदुमती केळकर, प्रेस्टिज प्रकाशन, पुणे-२

९४. लोहिया, राममनोहर 'जातिप्रथेचा तुरुंग,' प्रेस्टिज प्रकाशन, पुणे-२

नियतकालिके:

अनुभव, बायजा, बौद्ध भारत, समाजप्रबोधन पत्रिका, सत्यशोधक एल्गार, साप्ताहिक सकाळ, साधना, समाज आणि शिक्षण (क्ष्क्क् घ्द्दद्द), सत्यशोधक मार्क्सवादी, परिवर्तनाचा वाटसरु, पुरोगामी सत्यशोधक, विचारशलाका, शोधार्थी (लोकनीती, दिल्ली), विद्रोही, श्रमिक मुक्ती दल, नवभारत. इकॉनॉमिक अँड पॉलिटीकल विकली, सेमिनार इ.

**English Books and Articles:**

1. Bandyopadhyay, Sekhar (ed.) (2009)' 'Nationalist Movement in India-A Reader,' Oxford University Press.

2. Brooks, Maxwell R. (1946), 'American Class and Caste: An Appraisal: Social Forces', Vol. 25, No. 2 (Dec. 1946), Published by University of North Carolina Press. Stable URL-

http://jstor.org/stable/2571562

3. Chandra, Bipan 'Essays on Colonialism', Orient Longman Pvt. Ltd.

4. Chakravarty Uma (2003) 'Gendering Caste: Through a Feminist lens', Stree Publication, Calcutta.

5. Jaiswal, Survira (1998, 2005), 'Caste Origin, Function and Dimensions of Change', Mahohar Publishers and Distributors, New Delhi-2

6. Kate, Currie (1972), 'The Indian Stratification Debate: A Discursive Exposition of Problems and Issues in the Analysis of Class, Caste and Gender, Dialectical Anthropology', Vol. 17, Nov-2/June, 1992, Kluwer Academic Publishers, Printed in the Netherlands

7. Morrin, A. R. (ed.) (1996), 'The Legacy of G. S. Ghurye: A Centennial Festschrift', Popular Prakashan, Bombay.

8. Mukharjee Ramkrishna, (1999), 'Caste in Itself, Caste and Class or Caste in Class' Economic and Political Weekly', Vol. 34. No. 27, (Jul 3-9, 1999) p.p. 1759-1761
http://www.jstor.org/stable/4408152

9. Mathew, Thomas, (1992)' 'Ambedkar and Marxism', Economic and Political Weekly', June, 13-20, 1992
http://www.jstor.org/stable/4398517

10. Omvedt, Gail; (1976), 'Cultural Revolt in a Colonical Society: The non-Brahman Movement in Western India', 1873-1930, Scientific Socialist Education Trust, Bombay

11. Omvedt, Gail; (2005), 'Ambedkar: Towards an Enlightened India,' Penguin, Publication.

12. Omvedt, Gail; (2003), 'Buddhism in India: Challenging Brahmanism and Caste', Sage Publication.

13. Omvedt, Gail; (1995), 'Dalit Visions', Orient Longman Publication.

14. Omvedt, Gail; (1993), Reinventing Revolution: New Social Movements and Socialist Tradition in India', M.E. Sharpe Publication.

15. Omvedt, Gail; (1991), 'Violence Against Women: New Theories and New Movements in India,' Kali for Women

16. Omvedt, Gail; (June, 1978), 'Towards a marxist Analysis of Caste : A Response to B.T. Randive', (Article), Social Scientist, Vol. 6, No. 11 (Jan. 1978) p.p. 70-76

17. Omvedt, Gail; (1982). 'Marxists and Caste,' Economic and Political Weekly, Vol. 17, No. 10 (Mar 6, 1982), p. 345
http://www.jstor.org/stable/4370738

18. Omvedt, Gail; (Aug. 1973), 'Development of the Maharashtrian Class Structure, 1818 to 1931', Economic and Political Weekly, Vol. 8, No 31/33, Special Number (Aug. 1973) http://www.jstor.org/stable/4362921

19. Omvedt, Gail/Chetna Gala; (July 2, 1988), 'Peasant Question is a class Question', Economic and Political Weekly, Vol. 23, No. 27 (Jul. 2, 1988), pp 1394-1396 http://www.jstor.org/stable/4378707

20. Pankaj, Ashok K., (2007). 'Engaging with Discourse on Caste, Class and Politics in India,' South Asia Research 2007, 27, 333 http://Sar.sagepub.com/cgi/content/abstract/27/3/333

21. Patil, Sharad (Feb. 1979), 'Dialectics of Caste and Class Conflicts, Economic and Political Weekly, Vol. 14, No. 7/8, Annual Number-Class and Caste in India http://www.jstor.org/stable/4367349

22. Patil Sharad, (1989), 'Mobilising Scheduled Castes and Scheduled Tribes,' Economic and Political Weekly, September 2 – 9, 1989

23. Patil Sharad, (1995), 'Burden and Burden Bearers of Marx, Economic and Political Weekly, Dec 9, 1995

24. Palshikar Suhas & Rajeshwari Deshpande, 'Intergenerational Occupational mobility Across Caste Groups: A Study of Pune City', Dept. of Politics and Public Administration, University of Pune

25. Quigley, Declan, 'The Interpretation of Caste,' Oxford India Paperbacks' Oxford University Press.

26. Roy, Kumkum, (2008), 'Kosambi and Question of Caste,' Economic and Political Weekly, July, 26, 2008

27. Sharma, K.L. (ed.) (1995), 'Social Inequality in India,' Rawat Publications,' Jaipur and New Delhi

28. Sharma, K.L. (ed.) 'Caste and Class in India', Rawat Publications, Jaipur and New Delhi

29. Teltumbde, Anand (2006-2007) 'Capitalism and the Caste Question', Occassional Paper Series, Dept. of Sociology, University of Pune

30. Teltumbde, Anand (2008) 'Globalisation and Dalits: A Perspective of Buddhist Economics'; Srujan Prakashan, Navi Mumbai-14

31. Teltumbde, Anand; (2008) 'Khairlanji- A Strange and Bitter Crop,' Navayana Publishing.

32. Thapar, Ramila; (2008) 'Early Indian History and the Legacy of D.D. Kasambi', Economics and Political Weekly, July, 26, 2008

33. Thorner, Alice, (1982) 'Semi-Feudalism or Capitalism? Contemporary Debate on Classes and Modes of Production in India', Economic and Political Weekly, Vol. 17, No.51, (Dec-18, 1982)

http://www.jstor.org/stable/4371676

संशोधक

कांबळे संजयकुमार

स्त्री आणि लिंगभाव अभ्यास विभाग,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

संशोधन मार्गदर्शक

डॉ.अन्सारी एस .जी .

महाराष्ट्र उदयगिरी महाविध्यालय ,उदगीर